## कोनगाव वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १०२ /२०२५ दि.१७/०५/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कोनगाव वाहतुक उप विभागाचे हद्दीत रांजनोली नाका ते दुर्गाडी ब्रीज कोनतरी या भिवंडी – शिळफाटा राज्य महामार्ग क्रमांक ४४ रोडलगत व रांजनोली नाका परिसरात दुतर्फा व्यापरी वस्ती मोठया प्रमाणात वाढलेली आहे. खरेदीसाठी आलेली दुचाकी व चारचाकी वाहन धारक हे आपली वाहने रस्त्याच्या दुतर्फा अस्ताव्यस्तपणे उभी करतात. त्यामुळे इतर वाहनांना अडथळा निर्माण होतो. तरी सदर परिसरात वाहतुक कोंडी होवू नये व परीसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

- **नो पार्कींग झोन करण्यात येणारी ठिकाणे :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | रांजनोली नाका ते दुर्गाडी ब्रीज कोनतरी रस्त्याचे दुतर्फा | नो पार्किंग | ५.४ कि.मी. | २४ तास |
| २ | रांजनोली नाका ते भादवड नाका रस्त्याचे दुतर्फा | नो पार्किंग | १.९ कि.मी | २४ तास |

सदर अधिसूचना प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाच्या प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत असून कोणाची काही हरकत असल्यास त्या लेखी स्वरुपात **पोलीस उप आयुक्त कार्यालय, वाहतूक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२** येथे पाठवाव्यात. या बाबत काही सुचना आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अधिसूचना कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
**पोलीस उप आयुक्त,**
**वाहतूक विभाग, ठाणे शहर.**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १,२,३.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/भिवंडी/कल्याण डोंबिवली.

CS CamScanner

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
संबधित सपोआ, वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner